वागळे वाहतूक उपविभागाचे हददीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतूक अधिसूचना/ ४१ /२०२६ दि. २३ /०२/२०२६

–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

ज्याअर्थी, ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये **वागळे** वाहतूक उपविभागाचे हद्दीत मे. स्वास्तीक इन्फ्रालॉजिक प्रा.लि., नवी मुंबई यांचे वतीने कॅडबरी जंक्शन ते कोरम मॉल सर्व्हीस एकेरी रोड सिमेंट कॉक्रीटीकरण करण्याचे काम येणार आहे. त्यामुळे कॅडबरी जंक्शन ते कोरम मॉल या दरम्यानच्या रस्त्यावर वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद –	**१)** कॅडबरी जंक्शन ते कोरम मॉल/नितीन जंक्शनकडे सर्व्हीसरोडने जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **कॅडबरी जंक्शन सर्व्हीस रोड** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने कॅडबरी जंक्शन वरुन महामार्गावरील नाशिक–मुंबई लेनने नितीन जंक्शन मार्गे उजवीकडे वळण घेवून सर्व्हिस रोडने पुढे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना **दिनांक २०/०२/२०२६ रोजी पासुन ते दिनांक ३१/०५/२०२६ रोजी** पावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर,

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – १ व ५/वि.शा. ठाणे

प्रत कार्यवाहीसाठी :–

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.
प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– संबधित सपोआ, वाहतूक विभाग, ठाणे शहर व संबंधित प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावी